# गुप्त वंश

गुप्त राजघराण्याचा संस्थापक कोण?

गुप्तवंशाच्या राजघराण्याविषयी विद्वान परस्परविरोधी विधाने करतात.

**श्रीगुप्त –**

बहुतेक इतिहासकार श्रीगुप्ताला गुप्त घराण्याचा संस्थापक मानतात. प्रभावतीगुप्तच्या पुणे ताम्रपटात श्रीगुप्तचा उल्लेख 'अधिराज' म्हणून करण्यात आला आहे. ॲलन आणि जयस्वाल हे इतिहासकार पुराणांचे दाखले देऊन श्रीगुप्तालाच गुप्त घराण्याचा मूळपुरुष मानतात. पुराणात उल्लेख आहे की, गुप्तांचे वंशज गंगेच्या सभोवतालच्या प्रयाग, साकेत आणि मगध प्रदेशाचा उपभोग घेतील. यावरून या प्रदेशात राज्य करणाऱ्या वंशाच्या संस्थापकाचे नाव गुप्त होते हे स्पष्ट होते. गुप्तांच्या अभिलेखात गुप्तांची जी वंशावळ देण्यात आली आहे त्यातही वंशाचा मूळपुरुष म्हणून श्रीगुप्ताचेच नाव देण्यात आले आहे.

इ.स. ७ व्या शतकात भारतात आलेला चिनी प्रवासी आपल्या प्रवासवर्णनात लिहितो की, ५०० वर्षांपूर्वी चे-लि-के-तो नावाच्या एका राजाने मृगशिखावन किंवा मृगाक्षीवनजवळ एक चिनी मंदिर बांधले होते. हे मंदिर चिनी यात्रेकरूंच्या निवासासाठी बांधण्यात आले असून त्या मंदिराच्या खर्चासाठी राजाने २४ गावांचे उत्पन्न बांधून दिले होते. इतिहासकारांच्या मते हा चे-लि-के-तो राजा म्हणजे श्रीगुप्तच होय. ॲलन, स्मिथ आणि जयस्वाल इत्सिंगच्या श्रीगुप्तालाच गुप्त घराण्याचा संस्थापक मानतात. डॉ. मुखर्जींच्या मते गुप्तांच्या अभिलेखात श्रीगुप्ताचा उल्लेख महाराज आणि गुप्तांचा पूर्वज असा येतो त्यावरून श्रीगुप्तच गुप्त घराण्याचा संस्थापक होय.

घटोत्कच गुप्त - श्रीगुप्तनंतर त्याचा मुलगा घटोत्कच गादीवर आला. काही इतिहासकार घटोत्कचला गुप्त घराण्याचा संस्थापक मानतात. वैशाली येथे सापडलेल्या एका मुद्रेवर घटोत्कच हे नाव आढळून आले परंतु हा घटोत्कच गुप्त घराण्यातील नसून वैशाली येथील चंद्रगुप्त द्वितीयचा प्रांतीय अधिकारी असावा. घटोत्कच गुप्ताचा काळ इ.स. २८० ते ३१९ हा असावा.

**चंद्रगुप्त प्रथम**

घटोत्कचाचा पुत्र आणि गुप्तघराण्यातील तिसरा शासक चंद्रगुप्त हा इ.स. ३२० मध्ये गुप्तांच्या गादीवर बसला. त्याने याच वर्षी स्वतःला राज्याभिषेक करवून 'गुप्तसंवत' सुरू केला. त्याच्या पूर्वीच्या गुप्तशासकांनी 'महाराज' ही उपाधी धारण केली होती. परंतु 'महाराजाधिराज, ही उपाधी धारण करणारा तो पहिला गुप्तशासक होय. त्याचा आजतागायत कोणताही अभिलेख किवा प्रशस्ती प्राप्त झाली नसल्याने चंद्रगुप्त प्रथमविषयी फार अल्प माहिती मिळते. त्याच्याविषयी जी काही थोडीफार माहिती मिळते ती त्याच्या उत्तराधिकाऱ्याच्या अभिलेखातून मिळते. याच अभिलेखातून चंद्रगुप्त प्रथमने गादीवर येताच लिच्छवी राजकन्या कुमारदेवीशी विवाह केल्याचे कळते. लिच्छवी हे त्यावेळचे एक बलाढ्य गणराज्य होते. या गणराज्याशी विवाहसंबंध जोडल्याने चंद्रगुप्त प्रथमच्या लौकिकात अतोनात वाढ झाली. कुमारदेवीपासून झालेल्या समुद्रगुप्तला चंद्रगुप्ताने स्वतःचा उत्तराधिकारी नियुक्त केले यावरून कुमारदेवीचे चंद्रगुप्त प्रथमच्या आयुष्यातील स्थान लक्षात यावे. या विवाहसंबंधामुळे चंद्रगुप्त प्रथमला लिच्छवींकडून उत्तर बिहारचे राज्य प्राप्त झाले. या विवाहसंबंधाचे गुप्तांना किती कौतुक होते याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे समुद्रगुप्तने स्वतःला 'लिच्छवीद्रौहित्र' म्हणवून घेण्यात गौरव मानला.

कुमारदेवी व चंद्रगुप्त प्रथमच्या विवाहाची माहिती समुद्रगुप्ताच्या अलाहाबाद प्रशस्तीवरून मिळते. यात समुद्रगुप्तला महादेवी कुमारदेवीच्या गर्भापासून उत्पन्न झालेला लिच्छवींचा नातू (लिच्छवीद्रौहित्र) म्हणून संबोधण्यात आले आहे.

**चंद्रगुप्त प्रथमची नाणी –**

चंद्रगुप्ताने लिच्छवी गणराज्याच्या शैलीची स्वतःची नाणी पाडली. ती गुप्तांची पहिली नाणी होत. ही नाणी गाजीपूर, टांडा, मथुरा, बनारस, अयोध्या, सीतापूर, लखनौ आणि जुन्या भरतपूर संस्थानातील बयाना स्थानी मिळाली आहेत. चंद्रगुप्ताची जी नाणी सापडली त्यात त्याचे एक सुवर्ण नाणे सर्वात महत्त्वाचे आहे. या सुवर्ण नाण्याच्या एका बाजूला चंद्रगुप्त प्रथम आणि कुमारदेवीची प्रतिमा असून चंद्रगुप्त कुमारदेवीला बहुधा सोन्याची अंगठी देत आहे. या नाण्याच्या दुसऱ्या बाजूवर सिंहासनावर आरूढ देवतेचे चित्र असून त्यापाठीमागे सिहासन दाखविले आहे. नाण्यावर 'लिच्छवयः' असे कोरले आहे

**गुप्तसंवतची सुरुवात –**

चंद्रगुप्त प्रथम हा गुप्तवंशातील पहिला पराक्रमी सम्राट होय. त्याने गुप्तसंवतची सुरुवात केली. गुप्तांच्या अभिलेखात त्याचे स्पष्ट पुरावे मिळत नाहीत. गुप्तसंवत तिथीनिर्धारणासाठी चार गुप्तकालीन अभिलेखांची मदत होते. १) चंद्रगुप्त द्वितीयचा ६१ तिथीचा अभिलेख २) स्कंदगुप्तचा १३६ तिथीचा जुनागढ अभिलेख ३) कुमारगुप्त द्वितीयचा १५४ तिथीचा सारनाथ अभिलेख आणि ४) बुधगुप्तचा १५६

तिथीचा सारनाथ अभिलेख. या अभिलेखात अंकित तिथींवरून एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते आणि ती म्हणजे या तिथी त्यांच्या शासनकाळाचा निर्देश करीत नाहीत कारण कोणताही शासक इतक्या दीर्घकाळ शासन करणे शक्य नाही. याचा अर्थ या तिथी कोण्या एका संवतची संबंध दर्शवितात. स्कंदगुप्तच्या जुनागढ अभिलेखातील तिथीही गुप्तसंवतमधील देण्यात आली आहे. कुमारगुप्त द्वितीयच्या सारनाथ अभिलेखात हा गुप्तसंवतचा उल्लेख येतो. हा गुप्तसंवत चंद्रगुप्तने त्याच्या राज्याभिषेकाच्या इ.स. ३२० यावर्षी सुरू केला असावा.

**राज्यविस्तार** –

चंद्रगुप्ताला वारसाहक्काने जे राज्य मिळाले त्यात त्याने भर घातली. त्याने त्याच्या पूर्वजांच्या राज्याला स्थैर्य व सामर्थ्य दिले. त्याचे राज्य पश्चिमेला प्रयाग ते पूर्वेला मगधपर्यंत पसरले होते. समुद्रगुप्ताच्या अलाहाबाद (प्रयाग) प्रशस्तीवरून या विधानाला दुजोरा मिळतो. बहुतेक विद्वानांनी साकेत, प्रयाग आणि मगध चंद्रगुप्त प्रथमच्या राज्याचा भाग असल्याचे म्हटले आहे. चंद्रगुप्ताच्या राज्यविस्तारात त्याच्या लिच्छवींशी असलेल्या विवाहसंबंधाचा मोठा वाटा आहे. त्याला शक आणि वायव्येकडील रानटी टोळयांशी संघर्ष करावा लागला असा काही विद्वानांचा कयास आहे. गुप्तांचे राज्य खऱ्या अर्थाने चंद्रगुप्त प्रथमच्याच काळात निर्माण झाले काही इतिहासकार चंद्रगुप्त प्रथमलाच गुप्त साम्राज्याचा खरा संस्थापक मानतात. इ.स. ३३५ मध्ये चंद्रगुप्त प्रथमचा अंत झाला आणि त्याचा वारस समुद्रगुप्त गादीवर आला.

**समुद्रगुप्त**

समुद्रगुप्त हा गुप्त घराण्यातील सर्वश्रेष्ठ सम्राट होय. केवळ गुप्तांच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासातही जे सर्वश्रेष्ठ सम्राट होऊन गेले त्यात शौर्य, पराक्रम, प्रशासन, विद्वत्ता यामुळे समुद्रगुप्ताचे नाव सुवर्णाक्षराने लिहिले जाते. त्याला भारताचा नेपोलियन म्हणून संबोधण्यात येते.

**अलाहाबाद प्रशस्ती**

समुद्रगुप्तचा इतिहास जाणून घेण्यासाठी आलेख,मुद्रा, नाणी, स्मारके इ. विपुल साधने आहेत. या सर्वात अलाहाबाद येथील स्तंभलेख सर्वात महत्त्वाचा आहे. त्याला 'अलाहाबाद प्रशस्ती' असे म्हणतात. हा आलेख अशोक स्तंभावर आहे. सुरुवातीला तो कौशांबी येथे होता. त्यानंतर तो अलाहाबादच्या किल्ल्यात सुरक्षितपणे जतन करून ठेवण्यात आला. या स्तंभावर तिथी नसल्याने तो समुद्रगुप्तच्या मृत्यूनंतर लिहिण्यात आला असावा असे काही इतिहासकारांचे मत आहे. परंतु ज्याअर्थी यात अश्वमेध यज्ञाचा उल्लेख नाही त्याअर्थी हा आलेख समुद्रगुप्ताने दक्षिण दिग्विजय केल्यानंतर परंतु अश्वमेध यज्ञापूर्वी समुद्रगुप्तच्या हयातीतच लिहिला गेला असावा असे इतर विद्वानांचे मत आहे. समुद्रगुप्तच्या इतिहासावर प्रकाश टाकणारे हे सर्वाच महत्त्वाचे साधन आहे. समुद्रगुप्तच्या दरबारात हरिषेण नावाचा कवी होता. तो समुद्रगुप्तचा 'संधी- विग्राहक' (युद्धमंत्री) होता. त्याने प्रशस्ती लिहिली त्यातील काही भाग हा पद्यात्मक तर काही भाग गद्यात्मक आहे. प्रशस्तीचा सुरुवातीचा भाग पद्यात्मक असून त्यात समुद्रगुप्तच्या सुरुवातीच्या कारकीर्दीवर प्रकाश टाकण्यात आला आहे. यातून समुद्रगुप्तने काढलेल्या युद्धमोहिमा, मिळविलेले विजय, पराभूत राज्यांची नावे इ. माहिती मिळते.

**राज्याभिषेक** –

चंद्रगुप्त प्रथमला अनेक राण्या व मुले होती. कुमारदेवी ही लिच्छवीची राजकन्या त्याची सर्वात आवडती राणी हाती. तिच्या पोटी जन्माला आलेल्या समुद्रगुप्तावर चंद्रगुप्त प्रथमचा विशेष लोभ होता शिवाय समुद्रगुप्ताने अंगभूत गुणांनी जे कर्तृत्व सिद्ध केले त्यामुळे तो चंद्रगुप्त प्रथमच्या विशेष मर्जीतील होता. म्हणूनच चंद्रगुप्त प्रथमने त्याला स्वतःचा वारस घोषित केले. गुप्तांच्या नाण्यात काही नाणी कांचगुप्तांची आहेत. कांचगुप्त व समुद्रगुप्ताच्या नाण्यात अत्यंत साम्य आहे. त्यामुळे ॲलनच्या मते कांचगुप्त हे समुद्रगुप्ताचे मूळनाव असून त्याने दिग्विजय केल्यावर समुद्रगुप्त हे नाव धारण केले असावे.

राज्याभिषेकाची तिथी समुद्रगुप्तच्या राज्यरोहण तिथीविषयी वाद आहेत, नालंदा ताम्रपटानुसार समुद्रगुप्तचे राज्यारोहण इ.स. ३२५ च्या अगोदर झाले. डॉ. मुजुमदार ही तिथी इ.स. ३४० ते ३५० च्या दरम्यान सांगतात तर कि.ए. स्मिथच्या मते ही तिथी इ.स. ३३० ते ३७५ च्या दरम्यान असावी. डॉ. मुखर्जी ही निधी इ.स. ३३५ ही सांगतात. त्यांच्या मते यावेळी समुद्रगुप्तचे वय २५ वर्षांच्या आसपास असावे. बहुतेक इतिहासकारांनी इ.स. ३३५ ही तिथी समुद्रगुप्तच्या राज्यारोहणाची तिथी म्हणून मान्य केली आहे. समुद्रगुप्तचा दिग्विजय समुद्रगुप्ताने जे नेत्रदीपक विजय मिळविले त्यामुळे त्याची तुलना जगता अलेक्झांडर व नेपोलियनशी केली जाते. राज्यारोहण होताच समुद्रगुप्तने साम्राज्यविस्तारासाठी आक्रमक धोरणाचा अंगीकार केला. हरिषेण अलाहाबाद प्रशस्तीमध्ये लिहितो, "शंभर युद्धात भाग घेणाऱ्या समुद्रगुप्ताचे पुरुषी सौंदर्य युद्धातील जखमांच्या व्रणांनी अधिक खुलले होते." या प्रशस्तीमध्ये समुद्रगुप्तच्या मोहिमांच्या तिथी, त्यांचा क्रम देण्यात आला नाही परंतु थोड्या विचारांती हा क्रम लावणे अवघड नाही.

साम्राज्यविस्तारासाठी समुद्रगुप्तने ज्या मोहिमा काढल्या त्यांचे आपण ६ भागात विभाजन करू शकतो. १) उत्तर भारत मोहीम २) मध्य भारत मोहीम ३) दक्षिण भारत मोहीम ४) पूर्वेकडील मोहीम ५) पश्चिमेकडील मोहीम आणि ६) परकीय राज्यांविरुद्ध मोहीम.

**१) उत्तर भारत मोहीम हिमालय-**

हिमालय पर्वत आणि विंध्य पर्वत या दरम्यान - पसरलेल्या भूप्रदेशाला आर्यावर्त म्हणतात. समुद्रगुप्त जेव्हा गादीवर आला तेव्हा त्याच्या राज्यात मगधाचा काही भाग, अलाहाबाद, कोसल एवढेच प्रदेश मोडत होते. त्याने प्रथम संपूर्ण उत्तर प्रदेश (आर्यावर्त) जिकण्याचे ठरविले. यासाठी त्याने उत्तर भारतात दोन मोहिमा काढल्या. समुद्रगुप्तने उत्तरेतील ज्या ९ राज्यांना जिंकले त्यांचा अलाहाबाद प्रसस्तीमध्ये उल्लेख आहे.

अ) रूद्रदेव - रूद्रदेव हा कौशांबीचा राजा होता. समुद्रगुप्तने त्याचा पराभव केला.

ब) मतिला - डॉ. जयस्वालच्या मते मतिला हा नाग घराण्याचा राजा होता.

क) नागदत्त - नागदत्त हा नाग घराण्याचा राजा असून याच्या नाण्यांवरून याचे राज्य मथुरेच्या आसपास असावे. इ.स. ३२८ ते ३४८ हा याचा काळ होता.

ड) चंद्रवर्मन - डॉ. हरप्रसाद शास्त्रींच्या मते चंद्रवर्मन हा मारवाडचा, डॉ. जयस्वालच्या मते पंजाबचा तर इतरांच्या मते पुष्करणचा राजा होता. याची काही नाणी पश्चिम बंगालमध्येही सापडली आहेत. या निरनिराळ्या मतांमुळे याचे राज्य नेमकेकोणत्या भागात होते ते ठरविणे कठीण आहे.

इ) गणपती नाग - हा नाग वंशाचा असून पद्मावती याची राजधानी होती. याने इ.स. ३१० ते ३४४ या दरम्यान राज्य केले. विष्णुपुराणाचा आधार घेऊन डॉ. भांडारकर म्हणतात की गणपती नाग हा विदिशाचा राजा असावा. नरवार आणि बेसनगर येथे गणपती नागची काही नाणी सापडली आहेत.

फ) नागसेन- पुराणग्रंथानुसार हा पद्मावती व मथुरेचा राजा असावा.

ग) अच्युत - डॉ. जयस्वालच्या मते अच्युत आणि नंदी ही दोन्ही नावे एकाच व्यक्तीची आहेत. हा बरेली जिल्ह्यातील अहिछत्रचा राजा असावा.

ह) नंदी - डॉ. जयस्वालच्या मते अच्युत आणि नंदी ही दोन्ही नावे एकाच व्यक्तीची असल्याने नंदीचा स्वतंत्रपणे विचार करण्याची गरज नाही.

ई) बालवर्मन - काही इतिहासकार बालवर्मन हा आसामचा राजा भास्करवर्मन होय असे मानतात. परंतु आसाम आर्यावर्तात मोडत नसल्याने ते मत ग्राह्य धरता येत नाही. बालवर्मनविषयी निश्चित कोणतीही माहिती मिळत नाही.

प्रो. रॅप्सनच्या मते ही ९ राज्ये नागवंशीय होती. या राज्यांचा पराभव केल्यानंतर समुद्रगुप्तने 'गरुड' हे चिन्ह स्वीकारले. गरूड हा सापांचा शत्रू आहे. तो जसे सर्पांना नष्ट करतो त्याप्रमाणे समुद्रगुप्तने नागांना जिंकले. थोडक्यात समुद्रगुप्ताने स्वीकारलेले गरूड चिन्ह हे त्याच्या नागांवरील विजयाचे प्रतीक आहे. सुरुवातीला ही राज्ये जिंकल्यानंतर समुद्रगुप्ताने त्यांचे स्वातंत्र्य हिरावून न घेता त्यांना मांडलिक राज्यांचा दर्जा दिला परंतु कालांतराने त्यांनी बंड करताच त्यांचे स्वतंत्र अस्तित्व नष्ट करून त्यांना गुप्त साम्राज्यात समाविष्ट केले.

**२) मध्य भारत मोहीम –**

डॉ. फ्लिट, डॉ. रायचौधरी तसेच एरण शिलालेखानुसार उत्तर भारत मोहीम आटोपल्यानंतर समुद्रगुप्तने गाझीपूर ते जबलपूर या दरम्यानची मध्यभारतातील राज्ये जिंकली. हा सर्व प्रदेश घनदाट जंगलांनी व्याप्त असल्याने या प्रदेशात नेमकी कोणती राज्ये होती व तिथे कोणते शासक शासन करीत होते याविषयी निश्चित माहिती मिळत नाही.

**३) दक्षिण भारत मोहीम –**

उत्तर आणि मध्यभारतातील राज्ये जिंकल्यानंतर समुद्रगुप्त दक्षिण भारताकडे वळला. डॉ. मुखर्जीच्या मते समुद्रगुप्तच्या दक्षिण भारत विजयाची तीन वैशिष्ट्ये दिसतात. अ) ग्रहण (शत्रुचा पराभव) ब) मोक्ष (शत्रुची मुक्तता) आणि क) अनुराग (शत्रुवर दया). याचा अर्थ समुद्रगुप्ताने दक्षिण भारतातील राज्ये जिंकल्यानंतर ती नष्ट न करता त्यांचे स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवले. दक्षिणेच्या सर्व राज्यांनी समुद्रगुप्तचा प्रभुसत्ता मान्य केल्याने त्यांचा दर्जा मांडलिक राज्यांचा झाला. समुद्रगुप्तने दक्षिणेतील जिंकलेली राज्ये पुढीलप्रमाणे होती.

अ) कोसलदेशाचा राजा महेंद्र - त्या काळी कोसलांची दोन राज्ये होती त्यापैकी एक उत्तरेत असून त्याची राजधानी अयोध्या होती तर

दुसरे दक्षिणेत असून त्याची राजधानी श्रीपूर होती. डॉ. रायचौधरींच्या मते विलासपूर, संबलपूर, रायपूर हे जिल्हे आणि गंजम जिल्ह्याचा काही भाग दक्षिणेतील कोसल राज्याचा भाग होता आणि तेथे महेंद्र हा राजा राज्य करीत होता.

ब) महाकांतारचा व्याघ्रराज- हे राज्य कोसलांच्या दक्षिणेला असून जंगलांनी व्याप्त होते. व्याघ्रराज तेथील राजा होता.

क) कोलेयरचा मंत्रराज- कोराक, कोलेयर, कोराड या निरनिराळ्या नावानी ओळखले जाणारे हे राज्य दक्षिण-मध्य प्रदेशातील सोनपूर जिल्ह्यात होते

ड) पिष्टपूरचा महेंद्रगिरी - पुलकेशी द्वितीयच्या ऐहोळ शिलालेखावरून हे राज्य गोदावरी जिल्ह्यात असून तेथे महेंद्रगिरी हा राजा राज्य करीत होता.

इ) कोट्टरचा स्वामीदत्त - ओरिसा राज्यातील गंजम जिल्ह्यात हे राज्य असून त्यावेळी तेथे स्वामीदत्त हा राजा राज्य करीत होता.

फ) एरंडपल्ल - डॉ. फ्लिटच्या मते एरंडपल्ल म्हणजे खानदेशातील एरंडोल होय तर डबेव्हिलच्या मते हे राज्य गंजम जिल्ह्यात होते. काही इतिहासकारांच्या मते एरंडपल्ल म्हणजे विशाखापट्टणम्मधील एरंडपल्ली होय

ग) कांचीचा विष्णूगोप- मद्रासजवळील काची ऊर्फ कांजीवरम ही पल्लव राजांची राजधानी होती. तेथे विष्णूगोप नावाचा राजा राज्य करीत होता.

ह) अवमुक्तचा राजा निलराज- हे राज्य कांची आणि वेंगीच्या जवळ असावे समुद्रगुप्तच्या आक्रमणाच्या वेळी येथे निलराज हा राजा राज्य करीत होता.

ई) वेंगीचा हस्तीवर्मन- कृष्णा आणि गोदावरीच्या दरम्यान वेंगींचे राज्य होते. हे राज्य आजही अस्तित्वात आहे.

ज) पल्लकचा उग्रसेन- हे राज्य कृष्णा नदीच्या काठी नेलोर जिल्ह्यात असावे.

ख) देवराष्ट्रचा कुबेर - डॉ. फ्लिट आणि डॉ स्मिथच्या मते देवराष्ट्र म्हणजे महाराष्ट्र असावे परंतु हुतेक इतिहासकारांना हे मत मान्य नाही. त्यांच्या मते हे राज्य विश्वाखापट्टणम जिल्ह्यात असावे

ल) कोस्थळपूरचा धनंजय - हे राज्य अर्काट जिल्ह्यात होते. समुद्रगुप्ताने दक्षिणेतील ही सर्व राज्ये जिंकली. तेथील राजांना कैद करून समुद्रगुप्तने त्यांना कायमचे उपकृत करून ठेवले. समुद्रगुप्तच्या या उदार धोरणाचा उत्तर व दक्षिण भारतातील राज्यावर अनुकूल परिणाम होऊन त्यांनी समुद्रगुप्तला विरोध करण्याऐवजी त्याचे मांडलिकत्व राजीखुशीने मान्य केले.

**उत्तरेकडील वंड** –

समुद्रगुप्ताला उत्तरेत दोन मोहिमा काढाव्या लागल्या. पहिल्या मोहिमेत त्याने ९ राज्ये जिंकून त्यांना मांडलिक राज्यांचा दर्जा दिला. समुद्रगुप्त दक्षिणेतील स्वारीत गुंतलेला पाहून या उत्तरेकडील राज्यांनी बंड पुकारले. त्यामुळे समुद्रगुप्तला दक्षिणेतील मोहीम आटोपती घ्यावी लागून उत्तरकडे धाव घ्यावी लागली. यामुळेच समुद्रगुप्त दक्षिणेत कांचीच्या पलीकडे जाऊ शकला नाही. उत्तरेकडील दुसऱ्या मोहिमेत त्याने ९ राज्यांचे बंड मोडून काढून त्यांचे स्वातंत्र्य नष्ट केले व त्यांना गुप्त साम्राज्यात विलीन करून टाकले..

**४) पूर्वेकडील मोहीम** –

समुद्रगुप्ताचा पराक्रम आणि साम्राज्यविस्तार करीत असताना जिकलेल्या राज्यांचे स्वातंत्र्य नष्ट न करण्याची त्याची उदार दृष्टी यामुळे पूर्वकडील काही सीमावर्ती राज्यांनी स्वखुशीने समुद्रगुप्तचे मांडलिकत्व स्वीकारले. ही राज्ये पुढीलप्रमाणे होती.

अ) समतट - बंगालच्या आग्नेय भागात असलेले हे राज्य गंगा व ब्रह्मपुत्रेच्या त्रिभुज प्रदेशात होते. जेसोर हे या राज्यातील महत्त्वाचे ठिकाण होते.

व) कामरूप - आसाम हे याचे दुसरे नाव. समुद्रगुप्तच्या आक्रमणाच्या वेळी येथे पुष्यवर्मन किवा समुद्रवर्मन हा राजा राज्य करीत होता.

क) देवाक - बंगालच्या उत्तर भागात किंवा आसामच्या मध्यभागात कपिली नदीच्या खोऱ्यात हे राज्य असावे.

ड) कीर्तीपूर - यात गढ़वाल, कुमाऊँ आणि रोहिलखंडचा काही भाग समाविष्ट

इ) नेपाळ - हिमालयाच्या परिसरात हे राज्य असून तेथे जयदेव प्रथम हा असावा.

**५) पश्चिमेकडील मोहीम**

अ) मालव हे राज्य राजस्थानात असावे.

ब) अर्जुनायन - मध्यभारतात किवा पूर्वपंजाबमध्ये हे राज्य असावे.

क) यौधेय - हे रजपूत असून भरतपूर ते भावलपूर या दरम्यान हे राज्य पसरले होते.

ड) मुद्रक - रावी आणि चिनाब या दोन नद्यांच्या दरम्यानपसरलेल्या या  राज्याची राजधानी शाकल होती.

इ) अहीर - झांशी व भेलसा दरम्यान हे राज्य होते.
फ) प्रार्जुन - हे राज्य भेलसाजवळील नसिमगढ किंवा नरसिंहपूर येथे असावे.
ग) संकनिक - प्रार्जुनांच्या शेजारी हे राज्य होते.. ह) काक हे राज्य सांचीजवळ असावे. -
ई) खारपारिक - हे राज्य मध्यप्रदेशातील दमोह जिल्ह्यात असावे.

**पूर्व व पश्चिमेकडील मांडलिक राज्यांचे समुद्रगुप्ताप्रती धोरण -**

अलाहाबाद प्रशस्तीनुसार पूर्व व पश्चिमेकडील मांडलिक राज्ये समुद्रगुप्ताची मर्जी संपादन करण्यासाठी पुढील धोरणांचा अवलंब करीत.
अ) सर्वकरदान- समुद्रगुप्तला निरनिराळे कर देणे.
ब) आज्ञाकर्म- समुद्रगुप्तने वेळोवेळी दिलेल्या आज्ञांचे पालन करणे.
क) प्रणाम - समुद्रगुप्तपुढे नतमस्तक होणे.
ड) आगमन कार्यप्रसंगी दरबारात जातीने उपस्थित राहून सम्राटाप्रती निष्ठा - प्रकट करणे,

**इ) परकीय राज्ये**

भारताच्या वायव्य सीमेवर काही परकीयांची राज्ये होती. अलाहाबाद प्रशस्तीनुसार या राज्यांनी समुद्रगुप्तची प्रभुसत्ता मान्य केली व समुद्रगुप्तने त्यांच्याशी मैत्रीसंबंध ठेवले. राज्यांप्रती धोरण आखत असताना समुद्रगुप्तने या राज्यांना मांडलिकत्व स्वीकारण्यास भाग पाडले. त्यांच्या मुलींशी विवाहसंबंध जोडले. त्यांच्या प्रदेशात स्वतःची 'गरुडमुद्रा' प्रचलित केली व त्यांच्या राज्यात स्वतःची आज्ञा ही सर्वोच्च राहील ही व्यवस्था केली. समुद्रगुप्तने पुढील सीमावर्ती परकीय राज्यांविरुद्ध विजय मिळविले.
१) देवपुत्र मध्यपंजाबमधील कुशाण शासक स्वतःला देवपुत्र म्हणवीत.
२) शाही - पश्चिम पंजाबमधील किदार कुशाणांची ही उपाधी होती. त्यांनी समुद्रगुप्तेची प्रभुसत्ता मान्य केली.
३) शाहानुशाही - इराणचा सिरिनियन सम्राट सापुर द्वितीयने ही उपाधी धारण केली होती. काही इतिहासकारांच्या मते काबूल नदीच्या खोऱ्यातील कुशाणांनीही ही उपाधी धारण केली होती परंतु याविषयी निश्चित विधान करता येत नाही.
४) शक- समुद्रगुप्ताचे मांडलिकत्व स्वीकारणार शक नेमके कोणते याविषयी विद्वानांत मतभेद आहेत. प्रयाग प्रशस्तीमध्ये निर्देशित शकांना ॲलन उत्तर भारतातील मानतो. तर अळतेकर, डी.सी. सरकारसारखे विद्वान त्यांना पश्चिम भारतातील क्षत्रप चष्टन आणि रूद्रदामनचे वंशज मानतात. एक गोष्ट निर्विवाद की पश्चिम भारतातील शकांचे उच्चाटन चंद्रगुप्त द्वितीयने केले होते. याचा अर्थ समुद्रगुप्तच्या काळात पश्चिम भारतात शकांचा जोर कायम होता. त्यामुळे अलाहाबाद प्रशस्तीमध्ये निर्देशित शक है उत्तर भारतातील असावेत व त्यांनीच समुद्रगुप्तची प्रभुसत्ता मान्य केली असावी.
५) मुरुंड - ॲलनच्या मते मुरुंड जमातीच्या लोकांचे इ.स. तिसऱ्या शतकात शासन होते.अभिधान चितामणीमध्ये मुरुडांना लंपाक (अफगाणिस्थान) निवासी म्हटले आहे. स्टेनकोनोवच्या मते शकांच्या भाषेत मुरुंडचा अर्थ स्वामी असा होतो. यानुसार शक-मुरुड म्हणजे शकांचा राजा...
६) सैंथल - सिहल (लंका) द्वीपाच्या रहिवाशांना सैंधल म्हणत. श्रीलंकेवर समुद्रगुप्तने विजय मिळविला असावा कारण तसा उल्लेख अलाहाबाद प्रशस्तीमध्ये आहे.
७) सर्वद्वीपवासी- आग्नेय आशियातील काही द्वीप समुद्रगुप्ताने जिंकले असावेत. या काळात या भागात भारतीय संस्कृतीचा प्रवेश झाला होता.

वरील सर्व प्रदेश जिंकल्यानंतर समुद्रगुप्त एका विशाल साम्राज्याचा स्वामी बनला. यातील काही प्रदेश त्याच्या साम्राज्यात प्रत्यक्ष मोडत होता तर काही राज्यांनी त्याची प्रभुसत्ता मान्य केली होती. समुद्रगुप्ताचे साम्राज्य पूर्वेला ब्रह्मपुत्रा ते पश्चिमेला यमुना आणि चंबल नदी आणि उत्तरेला हिमालय ते दक्षिणेला नर्मदा नदीपर्यंत पसरले होते. या बाहेरील आसाम, गंगेचा त्रिभुज प्रदेश, राजपुतान्यातील गणराज्ये, माळवा गणराज्य, तथा काही परकीय राज्ये यांनी समुद्रगुप्ताची प्रभुसत्ता मान्य केली होती. समुद्रगुप्तने इ.स. ३३५ ते ३७५ या काळात राज्य केले. त्याने हे जे नेत्रदीपक विजय मिळविले त्यामुळे त्याच्या शिक्क्यांवर 'समर-शत- वितत-विजयी' (शंभर युद्धात विजयी होणारा) असा शब्दप्रयोग करण्यात आला आहे. अशोकानंतर सुमारे ६०० वर्षांनंतर एवढ्या मोठ्या भूप्रदेशावर समुद्रगुप्तानेच राज्य केले.

**अश्वमेधयज्ञ**

अलाहाबाद प्रशस्तीनुसार दिग्विजय मिळविल्यानंतर समुद्रगुप्तने अश्वमेध यज्ञ केला. वैदिक परंपरेनुसार समुद्रगुप्त हा अश्वमेध यज्ञाचा अधिकारी होता, या यज्ञाच्या वेळी समुद्रगुप्ताने ब्राह्मणांना जी सुवर्णनाणी दिली त्यावर एका बाजूला 'अश्वमेध पराक्रमः' असे कोरले आहे. दुसऱ्या बाजूला यज्ञवेदी असून एक घोडा यज्ञवेदीला बांधला आहे. बाजूलाच मुख्य पुरोहित चौरी घेऊन उभा आहे. या यज्ञामुळे समुद्रगुप्त हा राजांचा राजा चक्रवर्ती सम्राट म्हणून ओळखला जाऊ लागला.

**समुद्रगुप्तची योग्यता –**

भारताच्या इतिहासात जे सर्वश्रेष्ठ राजे होऊन गेले त्यांच्यात समुद्रगुप्ताचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. डॉ. व्हिसेंट स्मिथ तर समुद्रगुप्तानी तुलना नेपोलियनशी करतो परंतु समुद्रगुप्तच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा विचार केल्यास तो नेपोलियनपेक्षा श्रेष्ठ ठरतो. दोघेही जबरदस्त पराक्रमी व महत्त्वाकांक्षी होते. दोघांची तुलना केल्यास समुद्रगुप्त नेपोलियनपेक्षा सरस होता हे पुढील मुद्यांवरून स्पष्ट होईल.

१) समुद्रगुप्तला रणांगणावरील पराभवाची चव माहीत नव्हती तर नेपोलियनचे वाटर्लू येथे पानिपत झाले.

२) नेपोलियन महान विजेता असला तरी त्याला त्याच्या राज्यात शांतता व सुव्यवस्था राखता न आल्याने त्याच्या मृत्यूबरोबरच त्याचे साम्राज्य नष्ट झाले. उलट समुद्रगुप्तच्या साम्राज्यात शांतता व सुव्यवस्था नांदत असल्याने त्याच्या काळातच सुवर्णयुगाचा पाया रचला गेला व त्याच्या नंतर त्याचे साम्राज्य २०० वर्षे टिकले.

३) नेपोलियनपेक्षा समुद्रगुप्त हा थोर मुत्सद्दी होता. नेपोलियनने वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपोटी मांडलिक राजांचा छळ केला याउलट समुद्रगुप्ताने मांडलिक राजांना सन्मानाने वागवून भारतात विशाल एकछत्री साम्राज्य उभे केले.

४) नेपोलियन अत्यंत शंकेखोर व स्वार्थी होता उलट समुद्रगुप्त हा उदार मनाचा व खुल्या दिलाचा होता.

५) नेपोलियनपेक्षा समुद्रगुप्त हा उज्ज्वल चारित्र्याचा होता. नेपोलियनच्या चारित्रिक दुर्गुणांमुळे फ्रेंच जनतेचे नैतिक अधःपतन घडून आले. उलट समुद्रगुप्तने भारतीय जनतेचा नैतिक स्तर उंचावला.

६) नेपोलियनच्या आयुष्याचा शेवट ही एक शोकांतिका होती. त्याला शेवटचे आयुष्य बंदिवासात काढावे लागले. याउलट समुद्रगुप्ताने चक्रवर्ती सम्राटाच्या दिमाखाने स्वर्गारोहण केले.

वरील सर्व मुद्यांचा विचार केल्यानंतर लक्षात येईल की समुद्रगुप्त हा चारित्र्य, नीतिमत्ता, मुत्सद्दीपणा, शौर्य, युद्धकौशल्य इ. गुणांबाबत नेपोलियनपेक्षा निश्चितच वरचढ होता. त्याच्या योग्यतेचा विचार करताना त्याच्या याच गुणांचा आढावा येथे प्रस्तुत आहे.

**१) महान योद्धा व विजेता**

केवळ भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासातील एक महान योद्धा म्हणू समुद्रगुप्तचा उल्लेख केला जातो. अत्यंत निर्भय आणि वाघाच्या तडफेने लढणारा योद्धा म्हणून समुद्रगुप्त त्या काळी प्रसिद्ध होता. समुद्रगुप्तचा दरबारी कवी हरिषेण लिहितो, "समुद्रगुप्ताने १०० युद्धात भाग घेऊन जो पराक्रम गाजविला त्यामुळे त्याच्या संपूर्ण शरीरावर शस्त्रांनी झालेल्या जखमांच्या खुणा होत्या. या खुणांनी समुद्रगुप्तचे मर्दानी सौंदर्य अधिकच खुलून दिसते. "

इतिहासकार समुद्रगुप्ताची तुलना अलेक्झांडर व नेपोलियन या जगज्जेत्यांशी करतात. समुद्रगुप्तापूर्वी भारत हा लहान लहान राज्यात विभागला होता. ही लहान राज्ये आपसात सतत भांडत. त्यामुळे भारताची शक्ती विभागली जाऊन परकीय आक्रमकांना भारतावर आक्रमण करण्याची सुवर्णसंधीच लाभली होती. या शक्तिशाली आक्रमणांपुढे भारतातील लहान लहान राज्ये टिकणे शक्य नसल्याने भारत हा परकीय आक्रमकांचे माहेरघर बनला होता. समुद्रगुप्तने ही सर्व लहान राज्ये जिंकली आणि एका विशाल बलाढ्य साम्राज्याची भारतात निर्मिती केली. परिणामी प्रदीर्घ कालावधीनंतर भारतात राजकीय एकता निर्माण झाली. केवळ विजय मिळवून व विशाल साम्राज्याची र्मिती करूनच समुद्रगुप्त थांबला नाही तर या साम्राज्यात शांतता, सुव्यवस्था व स्थैर्य निर्माण करण्याच्या उदात्त कार्याला तो लागला व त्यात तो यशस्वी झाला. डॉ. मुखर्जीच्या मते समुद्रगुप्ताने आंतरराष्ट्रीय सामंजस्य, बंधुत्व व शांतता निर्माण केली. त्याने निरनिराळी राज्ये जिंकली परंतु ती नष्ट न करता जुन्याच राज्यकर्त्याकडे राज्यकारभार कायम ठेवून त्यांचा विश्वास व प्रेम संपादन केले. यामुळे राज्याराज्यांत शांतता व सामंजस्याचे वातावरण निर्माण होण्यास मदत झाली.

**२) कुशल प्रशासक –**

विजय मिळविणे सोपे असते. सम्राज्ये उभी करणेही तुलनात्मकदृष्ट्या सोपे असते. परंतु मिळविलेल्या विजयांना चिरस्थायी करणे दुष्कर असते. मिळविलेल्या विजयांना स्थैर्य देण्यासाठी जोड हवी असते कुशल प्रशासनाची. समुद्रगुप्त हा एक कुशल प्रशासक असल्यानेच तो एवढे विशाल साम्राज्य शकला समुद्रगुप्तच्या विशाल साम्राज्यातील उत्तर भारत त्याच्या प्रत्यक्ष अंमलाखाली होता. या

भागात त्याने अत्यंत प्रभावी शासनयंत्रणा राबविली होती. गुन्हेगारांना कठोर शासन केले जाई. त्यामुळे साम्राज्यात शांतता व सुव्यवस्था होती. साम्राज्यातील दूरवरच्या प्रांतांना त्याने प्रशासकीय स्वायत्तता बहाल केली होती.त्यांच्यावर समुद्रगुप्ताचे प्रभावी नियंत्रण होते व त्यांच्याकडून त्याला नियमित खंडणी मिळे.

**३) थोर मुत्सद्दी –**

समुद्रगुप्त हा थोर मुत्सद्दी होता. याचा प्रत्यय त्याच्या साम्राज्यविस्ताराच्या वेळी येतो. तो अत्यंत व्यवहारी आणि दूरदृष्टीचा होता. दक्षिण भारतात व पूर्व आणि पश्चिम सीमावर्ती राज्यांवर प्रत्यक्ष अम्मल गाजवणे कठीण आहे तसा प्रयत्न केल्यास सतत युद्धांना तोंड द्यावे लागेल हे दूरदृष्टीच्या चाणाक्ष समुद्रगुप्ताने जाणले. पण त्याचबरोबर या दूरस्थ राजांना स्वसामर्थ्याची जाण करून देणे आवश्यक होते. म्हणून त्याने दक्षिण भारतातील दूरवरची राज्ये प्रथम जिंकली व त्यांना स्वतःच्या तलवारीचे पाणी दाखविले आणि ती गुप्तांविरुद्ध डोके वर काढणार नाहीत याची खात्री होताच त्या राज्यांना अंतर्गत स्वायत्तता प्रदान करून त्यांना कायमचे उपकृत करून ठेवले. समुद्रगुप्ताची प्रभुसत्ता एकदा मान्य केली व त्याला नियमित खंडणी दिली की आपण अंतर्गत बाबतीत स्वायत्त कारभार करू शकतो याची खात्री/ पटताच दक्षिणेतील दूरवरच्या राज्यांनी समुद्रगुप्ताचे मांडलिकत्व निमूटपणे मान्य केले दक्षिणेकडील या राज्यांच्या अनुभवाने शहाणे होऊन पूर्व व पश्चिम सीमावर्ती राज्यांनीही त्यांचे अनुकरण करून समुद्रगुप्ताचे मांडलिकत्व स्वीकारले. उत्तरेकडील राज्यांनी एकजूट करून समुद्रगुप्ताविरुद्ध बंड करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला पण त्यांचे स्वतंत्र अस्तित्व नष्ट होऊन ती कायमची गुप्त साम्राज्याला जोडली गेली. यापासून इतर मांडलिक राज्यांनी धडा घेतला व त्यांनी समुद्रगुप्ताविरुद्ध एकदाही डोके वर काढण्याची हिम्मत केली नाही.

**४) मानवतावादी –**

वज्राहून कठीण आणि लोण्याहून मऊ असे समुद्रगुप्ताचे व्यक्तिमत्त्व होते. शत्रू आणि गुन्हेगारांसमोर अत्यंत कठोर भासणाऱ्या समुद्रगुप्ताचे हृदय दीन-दुबळे, अनाथ, विधवा, गरीब यांना पाहून अपार करुणेने उचंबळून येत असे. त्याने स्वकष्टार्जित पैशातून गरजूंसाठी अनेक सुखसोयी निर्माण केल्या. अलाहाबाद प्रशस्तीमध्ये त्याचा उल्लेख यमराज, कुबेर, वरुण, इंद्र इ. विशेषणांनी करण्यात आला आहे. थोडक्यात समुद्रगुप्त महान मानवतावादी होता.

**५) रसिकाग्रणी**

समुद्रगुप्त हा केवळ रसिकराजच नव्हता तर विद्वानांचा आश्रयदाताही होता. त्याच्या दरबारात अनेक विद्वानांना राजाश्रय लाभला होता. त्यामुळे त्याच्या शासनकाळात निरनिराळ्या कलांचा विकास झाला. तो केवळ कलेचा आस्वाद घेणारा रसिकच नव्हता तर चांगला कवी व वादकही होता. त्याच्या सापडलेल्या एका नाण्यावरून तो उत्तम वीणावादक व संगीताची जाण असलेला होता हे दिसून येते.

**६) सहिष्णू**

सत्ता त्यातही प्रचंड सत्ता माणसाला निरंकुशतेकडे खेचू लागते. सत्तेच्या जोरावर अप्राप्य ते प्राप्त करण्याचा व्यक्ती प्रयत्न करू लागते. व्यक्तीच्या महत्त्वाकांक्षेचा लगाम सैल होऊन 'तडजोड' हा शब्द तिच्या शब्दकोषातून बाद होतो. परंतु समुद्रगुप्त याला अपवाद होता. अमर्याद सत्ता हाती असूनही समुद्रगुप्ताने सहिष्णू धोरणाचा अंगीकार केला होता. धार्मिक बाबतीत तो अत्यंत उदारमतवादी होता. स्वतः वैदिक धर्माचा कट्टर अनुयायी असूनही त्याने श्रीलंकेचा राजा मेघवर्मनची विनंती मान्य करून त्याला बोधगया येथे बौद्धविहार बांधण्याची परवानगी दिली. एवढेच नव्हे तर वसुबंधू हा सुप्रसिद्ध बौद्धपंडित समुद्रगुप्तचा अमात्य होता.

समुद्रगुप्तचे व्यक्तिमत्त्व विविध अंगांनी विकसित झाले होते. सर्व सद्गुणांचा समुच्चय त्याच्या ठायी झाला होता. म्हणूनच भारताच्या इतिहासात समुद्रगुप्ताचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते.महान विजेता व विवेकी साम्राज्य संस्थापक समुद्रगुप्तावर स्तुतिसुमने उधळताना डॉ. मुजुमदार लिहितात, "भारतात जन्माला आलेल्या सर्वश्रेष्ठ प्रतिभावान युद्धविशारदांपैकी समुद्रगुप्त एक होय. त्याची संपूर्ण कारकीर्द एक महान लष्करी मोहीम होती. तो शतसंग्रामाचा रणवीर होता.

**रामगुप्त**

समुद्रगुप्ताला अनेक पुत्र होते. त्याच्यानंतर त्याचा ज्येष्ठ पुत्र रामगुप्त हा गुप्तसम्राट झाला पण तो अकार्यक्षम होता. शकराजाने गुप्तांच्या राजधानीवर आक्रमण करताच त्याने आक्रमणाचा प्रतिकार करण्याऐवजी स्वतःचा जीव वाचविण्यासाठी अत्यंत नामुष्कीचा तह स्वीकारला. स्वतःची पत्नी धृवदेवीला त्याने शकराजाकडे पाठविण्याचे मान्य केले रामगुप्तचा धाकटा भाऊ चंद्रगुप्त द्वितीयला ही गोष्ट सहन झाली नाही. तो स्वतःच धृवदेवीच्या वेशात शकराजाकडे गेला व त्याने शकराजाचा वध केला. अशा रीतीने गुप्त साम्राज्यावरील शकांचे संकट दूर होताच त्याने ज्येष्ठ बंधू रामगुप्तचा वध केला आणि धृवदेवीशी विवाह करून त्याने गुप्त साम्राज्याचा कारभार सांभाळला.

देवीचंद्रगुप्तम नाटकात वरील कथाभाग आला आहे. हर्षचरितमध्येही या घटनेला दुजोरा देण्यात आला आहे. काही इतिहासकार समुद्रगुप्तनंतर चंद्रगुप्त द्वितीय गुप्त सम्राट झाल्याचे मानतात. त्यांना रामगुप्त प्रकरण कपोलकल्पित वाटते. याबाबत संशोधनाला बराच वाव आहे.

**चंद्रगुप्त द्वितीय (इ.स. ३७५ ४१४)**

चंद्रगुप्त द्वितीय ऊर्फ चंद्रगुप्त विक्रमादित्य हा गुप्त घराण्यातील एक महान पराक्रमी आणि कर्तृत्ववान राज्यकर्ता होऊन गेला. फाह्यान या चिनी प्रवाशाने चंद्रगुप्त द्वितीयविषयी बरेच लिहून ठेवले आहे. एरणच्या शिलालेखानुसार समुद्रगुप्तला अनेक मुले होती. त्यापैकी रामगुप्त हा सर्वात ज्येष्ठ व चंद्रगुप्त द्वितीय त्याच्यापेक्षा धाकटा होता. चंद्रगुप्त द्वितीयच्या आईचे नाव दत्तदेवी असून त्याला धृवदेवी आणि कुबेरनागा या दोन राण्या होत्या. इतिहासात चंद्रगुप्तच्या निरनिराळ्या विशेषणांचा उल्लेख येतो. सांची शिलालेखात त्याला 'देवराज' तर वाकाटकांच्या शिलालेखात 'देवदत्त' म्हटले आहे. प्राचीन काळात शासनकर्त्यांना प्रजा प्रतिपरमेश्वर मानत असे. म्हणून त्यांच्या नावात देव शब्दाचा वारंवार वापर होत असे. मथुरा स्तंभलेख आणि सांची शिलालेखानुसार चंद्रगुप्त द्वितीय इ.स. ३७५ मध्ये गादीवर आला आणि इ.स. ४१४ मध्ये मृत्यू पावला. समुद्रगुप्ताने उत्तरेकडील बहुतेक राज्ये जिंकली असली तरी त्याच्या मृत्यूनतर ती राज्ये स्वतंत्र होण्याच्या प्रयत्नात होती. समुद्रगुप्तनंतर गादीवर आलेल्या रामगुप्तच्या दुबळेपणामुळे शकांच्या सामर्थ्यात वाढ होऊन त्यांच्यापासून गुप्त साम्राज्याला धोका निर्माण झाला होता. तेव्हा या सर्व गुप्तविरोधी शक्तींचा बंदोबस्त करून अखंडत्व कायम राखणे ही चंद्रगुप्त द्वितीयची फार मोठी जबाबदारी होती.

**वैवाहिक संबंध –**

वैवाहिक संबंधातून राजकारण साधण्याची परंपरा जुनी आहे. चंद्रगुप्तने त्याच्या पूर्वजांचा आदर्श डोळयासमोर ठेवून वैवाहिक संबंध प्रस्थापित केले.

**१) नागकन्या कुबेरनागाशी विवाह**

प्रभावती गुप्तच्या पुणे ताम्रपटावरूनचंद्रगुप्त द्वितीयने नागकन्या कुबेरनागाशी विवाह केल्याचे कळते. तत्कालीन उत्तर भारतात नागांची शक्ती लक्षणीय होती. समुद्रगुप्तने जरी नागराज्यांचा पराभव केला असला तरी काही भागांत नागांची राज्ये असून ती शक्तिशाली होती. तेव्हा त्यांच्याशी कायम वैर करण्यापेक्षा त्यांच्याशी विवाहसंबंधाद्वारे मैत्रीसंबंध स्थापन करण्यासाठी चंद्रगुप्ताने हा विवाह केला. त्यामुळे त्याच्या सामर्थ्यात अतोनात वाढ झाली.

**२) वाकाटक घराण्याशी विवाहसंबंध**

गुप्तकाळात दक्षिण भारतात वाकाटकांचे बलाढ्य राज्य होते. सौराष्ट्र, गुजरात या प्रदेशात शक हे अत्यंत बलवान होते. वाकाटकांचे राज्य हे शक व गुप्त राज्यांच्या दरम्यान असल्यामुळे या राज्याचे गुप्त साम्राज्याच्या संरक्षणाच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व होते. शकांपासून गुप्तांचा बचाव करण्यासाठी तसेच वाकाटकांच्या साह्याने त्यांना नष्ट करण्यासाठी वाकाटकांना विवाहाच्या नाजूक व पवित्र रज्जुनी बांधणे आवश्यक होते. यासाठी चंद्रगुप्त द्वितीयने त्याची मुलगी प्रभावती गुप्त हिचा विवाह वाकाटक राजा पृथ्वीसेन प्रथमचा मुलगा रूद्रसेन द्वितीयशी करून दिला. पृथ्वीसेन प्रथम इ.स. ३८५ मध्ये मृत्यू पावल्यानंतर त्याचा मुलगा रूद्रसेन द्वितीय वाकाटकांच्या गादीवर बसला. अशा रीतीने बलाढ्य वाकाटक घराण्याशी विवाह संबंध जोडून चंद्रगुप्तने कायमचे सख्य जोडले.

रूद्रसेन द्वितीय इ.स. ३९० मध्ये मृत्यू पावला. त्याची दोन्ही मुले अल्पवयीन असल्याने वाकाटकांचा संपूर्ण राज्यकारभार प्रभावती गुप्त हिने सांभाळला. तिला या राज्यकारभारात तिच्या वडिलांचे म्हणजे चंद्रगुप्त द्वितीयचे मार्गदर्शन लाभल्याने वाकाटकांच्या राज्यावर चंद्रगुप्त द्वितीयचे अप्रत्यक्ष वर्चस्व निर्माण झाले. प्रभावती गुप्तने इ.स. ३९० ते ४१० या काळात पित्याच्या मार्गदर्शनाखाली वाकाटकांचा शासनकारभार सांभाळला. इतिहासकारांच्या मते प्रभावती गुप्तच्या अल्पवयीन मुलांच्या शिक्षणासाठी चंद्रगुप्त द्वितीयने महाकवी कालिदासला वाकाटकांच्या राजधानीत पाठविले होते. तेथील वास्तव्यातच त्याने 'मेघदूत' हे सुप्रसिद्ध काव्य लिहिले.

**३) कुंतल राज्याशी मैत्रीसंबंध –**

प्राचीन काळी मुंबई प्रांताचा दक्षिण भाग आणि म्हैसूरचा उत्तर भाग या दरम्यानच्या प्रदेशाला कुंतल म्हणत. चंद्रगुप्तने या राज्याशी मैत्रीसंबंध प्रस्थापित केल्याने कुंतल राज्याने स्वतःच्या राज्याचा कारभार चंद्रगुप्ताच्या सल्ल्याने चालविला. चंद्रगुप्तच्या दरबारातील महाकवी कालिदास हा काही काळ कुंतल दरबारात गुप्तांचा राजदूत होता. यावरून या दोन राज्यांचे मैत्रीसंबंध किती घनिष्ठ होते ते कळते.

**४) कदंबांशी विवाहसंबंध –**

कदंब हे दक्षिण भारतातील एक प्रतिष्ठित राज्य होते. शांतीवर्माच्या तालगुंड स्तंभलेखावरून समजते की, काकुत्स्थ वर्मा नावाच्या एका कदंब शासकाने आपल्या मुलीचा विवाह चंद्रगुप्त द्वितीयचा मुलगा कुमारगुप्त प्रथमशी करून दिला होता. 'श्रृंगार प्रकाश' आणि 'औचित्य विचार चर्चा' या दोन ग्रंथातून गुप्त व कदंब यांच्यातील स्नेहसंबंधांवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**चंद्रगुप्तचे विजय**

चंद्रगुप्त द्वितीयला वारसा हक्काने विशाल साम्राज्य मिळाले होते. तरीही कधी या साम्राज्याला उत्पन्न झालेला धोका दूर करण्यासाठी तर कधी या साम्राज्यात भर घालण्यासाठी चंद्रगुप्तला सतत युद्धात गुंतून पडावे लागले.

**१) दक्षिणेकडील लहान गणराज्ये**

गुप्तसाम्राज्याच्या दक्षिणेला लहान लहान गणराज्ये होती. आपसात सतत लढून ती दुबळी झाल्याने चंद्रगुप्त द्वितीयने ती सर्व जिंकून गुप्तसाम्राज्याला जोडली.

**२) पश्चिम भारत विजय व शकांचा नायनाट**

पश्चिम भारतातील शकांवरील विजय ही चंद्रगुप्त द्वितीयच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाची घटना होय. समुद्रगुप्तने अनेक विजय मिळविले असले तरी पश्चिम भारतातील शकांवर त्याचा काही परिणाम न होता दिवसेंदिवस त्यांची शक्ती वृद्धिंगत होत होती. पश्चिम भारतात माळवा, सौराष्ट्र आणि काठेवाड येथे शकांचे अत्यंत शक्तिशाली राज्य होते. समुद्रगुप्तने मुत्सद्दीपणाने ४ शकांशी मैत्रीसंबंध प्रस्थापित केले असले तरी त्याच्या मृत्यूनंतर गुप्त-शक संबंध इतके बिघडले की, पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे शकांनी गुप्त साम्राज्यावर आक्रमण करून व समुद्रगुप्तचा मोठा मुलगा रामगुप्तचा पराभव करून त्याची पत्नी धृवदेवीची मागणी केली. चंद्रगुप्तने राज्यकारभार हाती घेतला तेव्हा शकाची तलवार गुप्तसाम्राज्याच्या मानेवर लटकत होती. त्यामुळे शकांचे सामर्थ्य अधिक वाढण्यापूर्वीच त्यांचा निकाल लावण्याचे चंद्रगुप्तने ठरविले. आक्रमण हाच संरक्षणाचा सर्वोत्तम उपाय असतो. समुद्रगुप्तप्रमाणे चंद्रगुप्तही धाडसी आणि पराक्रमी होता त्यामुळे त्याने शकांविरुद्ध आक्रमक धोरणाचा अंगीकार करण्याचे ठरविले. शकाविरुद्ध मोहीम हाती घेणारा चंद्रगुप्त द्वितीय हा पहिला गुप्तसम्राट होय. देवीचंद्रगुप्तम नाटक आणि हर्षचरित, माळव्यातील उदयगिरी गुहालेख, चंद्रगुप्त द्वितीयची पश्चिम भारतात सापडलेली चांदीची नाणी, दसपूरचा शासक नरवर्मा इ.स. ४०४ चा मंदसोर अभिलेख इ. ऐतिहासिक साधनांवरून चंद्रगुप्त द्वितीयच्या शक मोहिमेची व त्याने मिळविलेल्या विजयांची माहिती मिळते.

चंद्रगुप्त द्वितीयची शकमोहीम ही इ.स. ३८८ ते ३९७ च्या दरम्यान आखण्यात आली असावी हे निरनिराळया पुराव्यांवरून सिद्ध होते. चंद्रगुप्तने शकांविरुद्ध मोहीम काढताना माळवा येथे स्वतःच्या सैन्याची मुख्य छावणी उभारली. पूर्व माळव्यातील विदिशा येथे त्याने स्वतःच्या सर्व अमात्य, लष्करी अधिकारी, सामंत, सैनिक याना एकत्र केले. यावेळी रूद्रसिंग तृतीय हा शकांचा राजा होता. चंद्रगुप्तने त्याचा पराभव केला. रूद्रसिंग तृतीयनंतर कोणत्याही शकराजाची नाणी सापडली नाहीत यावरून शकांचे राज्य गुप्त साम्राज्यात विलीन करण्यात आले असावे. चंद्रगुप्तच्या एका नाण्यावर तो सिंहाची शिकार करताना दाखविले आहे. त्या काळी व आजही सौराष्ट्र येथे सिहांचे वास्तव्य आहे. नाण्यावरील सिंह हे शकांचे प्रतीक आहे. शकांचा पराभव केल्यानंतर चंद्रगुप्त द्वितीयने स्वतःची चांदीची नाणी पाडली. ही नाणी चंद्रगुप्ताने शकांचा पराभव केल्याचे दर्शवितात.

**शक मोहिमेचे परिणाम**

चंद्रगुप्त द्वितीयची शकांविरुद्ध यशस्वी मोहीम ही गुप्तांच्याच नव्हे तर संपूर्ण भारताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची घटना होय. या मोहिमेनंतर चंद्रगुप्त द्वितीय हा शकारी (शक+अरी = शकारी) म्हणजे शकांचा शत्रू म्हणून ओळखला जाऊ लागला. या विजयामुळे पश्चिम माळवा, गुजरात, काठेवाड हे प्रदेश गुप्त साम्राज्यात समाविष्ट होऊन गुप्तसाम्राज्य पूर्वेला बंगालचा उपसागर ते पश्चिमेला अरबी समुद्र या विशाल भागात पसरले. या राजकीय लाभाशिवाय आर्थिक व सांस्कृतिकदृष्ट्या ही मोहीम महत्त्वपूर्ण होती. या विजयामुळे पश्चिम समुद्रकिनाऱ्यावरील "अत्यंत भरभराटीला आलेले भृगुकच्छ (भडोच) हे बंदर गुप्तांच्या ताब्यात आले. जातक कथांमधील उल्लेखानुसार याच बंदरातून भारतीय व्यापारी परदेशाशी व्यापार करण्यासाठी जात. प्लिनी या इतिहासकाराच्या मते दरवर्षी रोममधून पाच कोटी सुवर्णनाणी या बंदरातून भारतात येत व मोबदल्यात भोगविलासी सामुग्री घेऊन जात यावरून गुप्तसाम्राज्याला या बंदराच्या प्राप्तीमुळे किती प्रचंड आर्थिक लाभ झाला याची कल्पना येते.

भृगुकच्छ बंदर ताब्यात आल्याने भारताचा पश्चिमेकडील देशांशी सांस्कृतिक संपर्क वाढला. वराहमिहीरने त्याच्या 'रोमक सिद्धांत' मध्ये ज्या नक्षत्राचा उल्लेख केला आहे ती सर्व नावे ग्रीक वाटतात. त्यावरून रोमक सिद्धांत ही ग्रीकांनी भारताला दिलेली देणगी होय

असे विद्वान मानतात. वराहमिहीरच्या होराशास्त्रावरही (ज्योतिषशास्त्र) ग्रीक प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. गार्गी संहितेत ग्रीकांना ज्योतिषशास्त्राचे जनक मानण्यात आले आहे. शकांवरील विजयानंतर चंद्रगुप्त द्वितीयने 'विक्रमांक' (विक्रमादित्य) ही उपाधी धारण केली. चंद्रगुप्त द्वितीयच्या शकावरील विजयामुळे कित्येक शतके भारताला आतंकित करणाऱ्या शकांचे भारतातून कायमचे उच्चाटन झाले.

**वायव्य प्रांतावर स्वारी**

मेहरौली लोहस्तंभ आलेखानुसार शकांचा पराभव केल्यानंतर चंद्रगुप्त द्वितीय वायव्येकडे वळला. त्याने सिधू नदी पार करून बल्ख प्रांतावर स्वारी केली व तो प्रांत स्वतः च्या साम्राज्याला जोडला. परंतु काही इतिहासकार या स्वारीचा संबंध बल्ख किवा बॅक्ट्रियाशी न जोडता वाहलीक या जमातीशी जोडतात. जी विपाशा (व्यास) नदीच्या दोन्ही काठाच्या समीपवर्ती प्रदेशात वास्तव्य करीत होती व अतिशय शक्तिशाली जमात होती. यांच्यावर विजय मिळवून चंद्रगुप्त द्वितीयने 'विष्णु'मध्ये व्यास किवा विवास नदीजवळील स्थान) पर्वतावर विवा स्थापना केली.

**बंगालविजय**

समुद्रगुप्तने त्याच्या पूर्वभारतावरील स्वारीत पश्चिम बंगालमधील बांकुडा जिल्हा पहिलेच जिंकला होता. केवळ उत्तर-पूर्व बंगाल गुप्त साम्राज्याच्या बाहेर होता. चंद्रगुप्त द्वितीयचे कोणतेही अभिलेख बंगालमध्ये मिळाले नसले तरी त्याचा उत्तराधिकारी कुमारगुप्त प्रथमने त्याला बंगालचा प्रदेश वारसाहक्काने मिळाल्याचा उल्लेख केला आहे. यावरून हा प्रांत चंद्रगुप्त द्वितीय कल्पाचे स्पष्ट होते. मेहरीली लोहस्तंभही चंद्रगुप्त द्वितीयच्या बंगाल विजयाला दुजोरा देतो. समुद्रगुप्तच्या मृत्यूनंतर बंगाल प्रदेशातील समतट, देवक, कामरूप इ. राज्यांनी एकत्र येऊन एक संघ तयार केला व गुप्तसाम्राज्यावर आक्रमण करण्याची योजना आखली परंतु चंद्रगुप्तने त्यांच्याविरुद्ध मोहीम काढून त्यांचा पराभव केला त्या चंद्रगुप्त द्वितीयच्या साम्राज्याचा विस्तार पूर्वेला कामरूप (आसाम) पर्यंत झाला. या विजयामुळे संपूर्ण बंगाल प्रांत गुप्तसाम्राज्यात समाविष्ट झाला. हा विजय गुप्तांना अत्यंत लाभदायक ठरला कारण भारताच्या पूर्व किनाऱ्यावरील सर्वात महत्त्वाचे बंदर ताम्रलिप्ती गुप्तांच्या ताब्यात आले. सुमात्रा, जावा, बोर्निओ या देशांशी होणारा सारा व्यापार याच बंदरातून चालत असे. अशा रीतीने चंद्रगुप्त द्वितीयचे साम्राज्य दोन्ही समुद्रांना स्पर्श करू लागले.

**मेहरौली लोहस्तंभ**

दिल्लीपासून जवळच काही मैल अंतरावर मेहरौली - नावाचे एक खेडे आहे. आज हे खेडे दिल्ली शहराचाच एक भाग बनले आहे. तेथे कुतुबमिनारजवळ हा लोहस्तंभ असून त्यावर चंद्रगुप्त द्वितीयची प्रशस्ती आहे.

**अश्वमेध यज्ञ**

चंद्रगुप्त द्वितीयने अश्रमेध यज्ञ केला असण्याची शक्यता आहे कारण वाराणसीजवळील एका खेड्यात तसे पुरावे आढळून आले आहेत.

**विक्रमादित्य उपाधी**

बंगाल आणि सौराष्ट्र जिंकल्यानंतर बंगालचा उपसागर आणि अरबी समुद्र या दरम्यानच्या विशाल भूप्रदेशाचा चंद्रगुप्त द्वितीय स्वामी झाला. त्यामुळे त्याने 'विक्रमादित्य' ही अत्यंत समर्पक उपाधी धारण केली. इ.स.पू. पहिल्या शतकात उज्जैनच्या एका राजाने शकांचा पराभव करून विक्रमादित्य ही उपाधी धारण केली होती. चंद्रगुप्तच्या द्वितीयच्या नाण्यांवर विक्रम, विक्रमांक, विक्रमादित्य ही नावे कोरलेली आढळतात

**चंद्रगुप्त द्वितीयची योग्यता -**

गुप्त घराण्याने भारताला एकाहून एक महान राज्यकर्ते दिले आहेत. चंद्रगुप्त द्वितीय त्या मालिकेत एखाद्या तेजस्वी ताऱ्याप्रमाणे शोभून दिसतो.

**१) महान विजेता**

चंद्रगुप्त द्वितीय अत्यंत सामर्थ्यशाली सम्राट होता.त्याच्या सुदैवाने त्याला विशाल साम्राज्याचा वारसा मिळाला होता. या साम्राज्याचे चंद्रगुप्तने केवळ रक्षणच केले नाही तर त्यात प्रादेशिक भर टाकली. सीमावर्ती राज्यांपासून गुप्त साम्राज्याला असलेला धोका लक्षात घेऊन ती राज्ये जिंकून त्यापैकी काही गुप्तसाम्राज्यात विलीन केली तर काहींना मांडलिक राज्यांचा दर्जा दिला. केवळ भारतीय राजांचाच पराभव न करता त्याने शक व कुशाण या परकीय शक्तिशाली राज्यकर्त्यांनाही वठणीवर आणले.

**२) कुशल प्रशासक** चंद्रगुप्त द्वितीय हा कुशल प्रशासक होता. प्रशासनाच्या सोयीसाठी त्याने साम्राज्याचे निरनिराळे भाग करून त्यावर कार्यक्षम अधिकारी नियुक्त केले. त्याच्या प्रशासकीय गुणवैशिष्ट्यांमुळेच गुप्तकाळात भारताची सर्वांगीण प्रगती झाली. डॉ : स्मिथच्या मते या काळानंतर इतके उत्कृष्ट प्रशासन भारताला पुन्हा कधीही लाभले नाही.

**३) सुसंस्कृत सम्राट**

चंद्रगुप्त द्वितीय हा कला, साहित्य आणि शिक्षणप्रेमी होता. महाकवी कालिदास त्याचा दरबारी कवी होता. साहित्याच्या पुनर्जागरणाचा हा काळ होता. त्याची नाणी त्याच्यापूर्वी होऊन गेलेल्या राज्यकर्त्यांच्या नाण्यांपेक्षा जास्त सुबक व आकर्षक होती. या काळात वास्तुकला व शिल्पकलेच्या क्षेत्रात उत्कृष्ट निर्मिती झाली. पाटलीपुत्र येथील राजवाडा व त्या नगरीचे प्रशासन पाहून फाह्यान थक्क झाला - होता. चंद्रगुप्त द्वितीय स्वतः निरनिराळ्या कलांचा भोक्ता असल्याने त्याने त्याच्या साम्राज्यात या सर्व कलांच्या प्रगतीसाठी विशेष प्रयत्न केले. म्हणूनच त्याच्या कारकीर्दीत सांस्कृतिक क्षेत्रात भारताने प्रगतीचे अत्युच्च शिखर गाठले.

चंद्रगुप्ताच्या दरबारात निरनिराळ्या क्षेत्रातील विद्वान होते. त्यापैकी ९ प्रमुख असून त्यांना नवरत्न म्हणत. त्यांचा मिळून चंद्रगुप्त द्वितीयचा नवरत्नदरबार होत असे. ही नवरले पुढीलप्रमाणे होती.

**१) पहाकवी कालिदास** भारताचा शेक्सपियर म्हणून प्रसिद्ध असलेला कालिदास हा सार्वकालिक आणि सर्वश्रेष्ठ नाटककार व कवी होय. त्याच्या जवळ जवळ सर्व नाटकांचे जगातील निरनिराळया भाषांमध्ये भाषांतर झाले असून त्याची नाटके आजही प्रेक्षकांना भुरळ पाडतात. शाकुंतल, मालविकाग्निमित्र ही नाटके आणि मेघदूत, ऋतुसंहार, रघुवंश इ. त्याचे काव्यग्रंथ प्रसिद्ध आहेत.

**२) अमरसिंह** -अमरकोषकार

३) विशाखादत्त- नाटककार

४) वराहमिहीर - ज्योतिषशास्त्र

५) वरूची - वैय्याकरणी

६) क्षपणक - फलज्योतिषी

७) धन्वंतरी-वैद्य

८) शंकू -शिल्पकार

९) वेतालभट्ट मांत्रिक.

हे सर्व विद्वान चंद्रगुप्त द्वितीयच्या दरबाराची शान होते. आज सुमारे १६०० वर्षांनंतरही या विद्वानांच्या कार्याची दखल घेतली जाते. यावरून त्यांची योग्यता लक्षात यावी.

**4) सहिष्णू सम्राट –**

चंद्रगुप्त द्वितीय हा वैष्णव पंथाचा होता. त्याने सर्वच धर्मा उदार व सहिष्णू दृष्टिकोन बाळगला होता. जात-पात, धर्म-वंश यांचा विचार न करत गुणवत्तेच्या भरवशावर त्याने योग्य व्यक्तींना प्रशासनात महत्त्वाच्या जागा दिल्या होत्या.

**5)कल्याणकारी सम्राट –**

साम्राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी चंद्रगुप्त द्वित नेहमीच प्रयत्नशील असे. याच उद्देशाने त्याने साम्राज्याच्या राजधानीचे पाटलीपुत्र येथून उज्जैन येथे स्थलांतर केले. परिणामी उज्जैन हे राजकारण व व्यापाराचे आंतरराष्ट्रीय केंद्र बनले. चंद्रगुप्त द्वितीयने प्रजेच्या सुखसोयींसाठी जागोजागी मंदिरे, धर्मशाळ विहिरी, स्तूप, द्वाखाने बांधले.

वरील सर्व गोष्टींवरून चंद्रगुप्त हा असामान्य योग्यतेचा सम्राट होता है स्पष्ठ होईल.